# जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर **यांचे** कार्यालय

ई-मेल : chandrapur.rdc@gmail.com फोन क्रमांक - 07172-250659
क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/466 दिनांक :- 11 मे, 2020

---

<u>वाचा</u> :- या कार्यालयाचे आदेश क्रं. एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/461 दिनांक 10.05.2020.

## -: आदेश :-

संदर्भीय आदेशान्वये फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 (1974 चे 2) चे कलम 144 चे अन्वये जिल्हयात दिनांक 11 मे, 2020 पासून ते 17 मे, 2020 पर्यंत लॉकडाऊन मध्ये सुरु असणाऱ्या आस्थापना बाबत खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे.

जिवनाश्यक वस्तु विक्री व वितरण इ. आस्थापना/दुकाने **<u>या व्यतिरिक्त</u>** इतर सर्व प्रकारची आस्थापना/दुकाने (<u>सदर आदेशामधील प्रतिबंधात्मक बाबीमधील अ.क्रं. (viii व ix) मध्ये नमुद असलेली आस्थापना/दुकाने सोडून</u>) **<u>सोमवार ते शनिवार</u>** या दिवशी **<u>सकाळी 10.00 ते दुपारी 02.00</u>** या वेळेत सुरु राहतील व **<u>रविवार ला सदर दुकाने पुर्णत: बंद राहतील</u>**. परंतु आपले दुकान/आस्थापना समोर आणि फुटपाथवर कोणत्याही प्रकारचे साहित्य ठेवता येणार नाही.

परंतू जिवनाश्यक वस्तु विक्री व वितरण इ. आस्थापना/दुकाने **<u>या व्यतिरिक्त शेती संबधीत बी-बीयाणे, खते, किटकनाशके यांचेशी निगडीत उत्पादन व पॅकेजींग आणि किरकोळ विक्री संबधीत उद्योग/आस्थापना/दुकाने सोमवार ते शनिवार</u>** या दिवशी सुधारीत वेळ ही **<u>सकाळी 10.00 ते सायंकाळी 05.00</u>** या वेळेत सुरु राहतील व **<u>रविवार ला सदर दुकाने पुर्णत: बंद राहतील.</u>**

संदर्भीय आदेशातील इतर सर्व अटी व शर्ती कायम राहतील. सदरचा आदेश संपुर्ण जिल्हयामध्ये दिनांक 11/05/2020 ते दिनांक 17/05/2020 या कालावधीकरिता लागु राहील.

**सदरचा आदेश आज दिनांक 11 मे, 2020 रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला आहे.**

स्वा/-
(डॉ. कुणाल खेमनार)
जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर

**<u>प्रतिलीपी :- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.</u>**

1. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
3. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर
4. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
5. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
6. मुख्याधिकारी, नगर परिषद/ नगर पंचायत (सर्व)
7. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर

**<u>सदर आदेशाची उपरोक्त अधिकारी यांनी प्रसिध्दी द्यावी.</u>**

जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर